# आव्हान-२०१९ : चॅन्सेलर्स ब्रिगेड

## राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिवीर

## दि. ०३ जून २०१९ ते दि. १२ जून २०१९

# अहवाल

- दि.२० मार्च २०१९ रोजी मा.राजभवन येथे "सल्लागार समिती"ची बैठक संपन्न झाली. त्यामध्ये दि.०३ जून ते दि.१२ जून २०१९ या कालावधीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले.

- दि.२७ व २८ एप्रिल २०१९ रोजी मा.डॉ.अतुल साळुंके, राज्यसंपर्क व विशेष कक्ष, रासेयो अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आव्हान-२०१९ च्या नियोजनाबाबतची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले हे उपस्थिती होते. याप्रसंगी महाराष्ट्रातील २० पैकी १७ विद्यापीठांच्या रासेयोचे संचालक, जिल्हा समन्वयक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.
  या कार्यशाळेस महाराष्ट्र आणि गोवा राज्याचे रासेयो विभागाचे अधिकारी आणि रासेयो प्रादेशिक कार्यालय, पुणेचे संचालक मा. डी. कार्थीगुयेन, रासेयो प्रशिक्षण केंद्र, अहमदनगरचे संचालक डॉ. शरद बोरुडे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. रमजान मुलाणी, वित्त व लेखाधिकारी डॉ. जी. बी. कतलाकुटे, संचालक रासेयो डॉ. शिवराज बोकडे, आव्हान-२०१९ चे समन्वयक डॉ अविनाश कदम आणि इतर मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती.

- मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राजभवन येथील बैठकीतील मार्गदर्शनानुसार विविध १० समित्यांचे गठन करण्यात आले. या सर्व समित्यांतील सर्व सदस्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर यशस्वी होण्याकरिता मोलाचे सहकार्य केले.

- मा. राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून आलेल्या सुचनांप्रमाणे आणि मा. डॉ. अतुल साळुंके यांच्या मार्गदर्शनाने सर्व माहिती ONLINE FORM तयार करून मिळविण्यात आली. त्यामध्ये सहभागी सर्व २० विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक, महाराष्ट्रातील सर्व जिल्हा समन्वयक, महाराष्ट्रातून येणाऱ्या सर्व संघव्यवस्थापक यांची माहिती या ONLINE प्रक्रीयेव्दारे मागविण्यात आली. तसेच आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरातील सहभागी १२३६ स्वयंसेवक- स्वयंसेविका यांचा नोंदणी अर्ज ONLINE पद्धतीने भरून घेतला.

- आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्रातील १८ विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारे, शिस्तप्रिय ७४५ स्वयंसेवक, ३९१ स्वयंसेविका, ३५ संघ व्यवस्थापक आणि ३१ संघ व्यवस्थापिका अशा एकूण १२०२ आदींनी सहभाग घेतला.

- दि. ०२ जून आणि दि. ०३ जून २०१९ रोजी आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरामध्ये सहभागी स्वयंसेवक, स्वयंसेविका आणि संघव्यवस्थापक या सर्वांची नोंद घेऊन, त्यांना शिबिराचे साहित्य वाटप करण्यात आले, त्यामध्ये बॅग, टी-शर्ट, पाण्याची बॉटल, आव्हान-२०१९ च्या निमित्ताने प्रकाशित केलेली माहिती पुस्तिका आणि अभ्यास पुस्तिका तसेच शिबिराच्या प्रात्यक्षिकासाठी लागणारे इतर सर्व साहित्याचा समावेश होता.



Scanned by CamScanner

- महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल महोदय तथा विद्यापीठाचे कुलपती चे. विद्यासागर राव यांच्या हस्ते दि. ०३ जून २०१९ रोजी सकाळी ठीक १० वाजता आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन संपन्न झाले. यावेळी मा.कुलपती महोदयांनी "आव्हान-२०१९" यशस्वी होण्याकरिता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मा. डॉ. अतुल साळुंके, राज्यसंपर्क व विशेष कक्ष, रासेयो अधिकारी, मंत्रालय, मुंबई आणि या विद्यापीठाचे कुलगुरू महोदय डॉ. उद्धव भोसले यांनी उपस्थितांना संबोधित केले. श्री. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान सचिव, राज भवन, मुंबई, यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ.रमजान मुलाणी यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.शिवराज बोकडे यांनी मानले. व्यासपीठावर आव्हान-२०१९चे समन्वयक डॉ अविनाश कदम यांची उपस्थिती होती.

- या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. अरुणजी डोंगरे, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.रवींद्र सिंगल, पोलीस अधीक्षक संजय जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेच्या राजदूत नवेली देशमुख यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आदींची या समारंभास उपस्थिती होती.

- दि. ०३ जून २०१९च्या दुपार पासूनच शिबिराची सर्व सूत्र NDRF चे श्री. पुरूषोत्तम राणा आणि त्यांच्या अधिकारी – प्रशिक्षक, ४४ जवानांच्या संघाने स्वीकारली. गोदावरी, मांजरा, आसना, पैनगंगा आणि पूर्णा या पवित्र नद्यांच्या नावाचे विविध रंगांचे गट, प्रशिक्षणासाठी, नियोजनासाठी तयार करण्यात आले होते.

- NDRF कडून दररोज सकाळी ६ ते ७.३० या वेळेत विद्यापीठाच्या क्रीडांगणावर योगा, कवायत - पी.टी.चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शरीर रचना, व्यायामाचे प्रकार आणि महत्व आदींची प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली.

- सकाळी ९.०० ते दुपारी १.००च्या तांत्रिक सत्रामध्ये अभ्यासक्रमातील धडे ध्वनी-चल-चित्र फितींच्या सहाय्याने, प्रात्यक्षिकांच्या उपकरणांसह NDRF च्या पाच टीमने, पाच विविध ठिकाणच्या वर्गांमध्ये अगदी प्रत्येकापर्यंत जाऊन, प्रत्येकाच्या सहभागासह समजावून दिले.

- दि. ०६ जून ते दि. १० जून दरम्यान क्षेत्रीय-प्रशिक्षण (OUT-DOOR) अंतर्गत कसरती – आपत्तीच्या काळातील कार्यांची प्रात्याक्षिके, दररोज एका गटास देण्यात आली. सकाळी ६ ते दुपारी १ पर्यंत शंकरसागर, श्रीक्षेत्र काळेश्वर, विष्णुपुरी, नांदेड येथे पाण्याशी संबंधीत प्रात्याक्षिके दाखविण्यात आली. दुपारच्या भोजनानंतर विद्यापीठाच्या भव्य ग्रंथालय इमारतीवर सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत विविध इतर आपत्तींचे धडे देण्यात आले. त्यामध्ये दोरी आणि इतर साधनांच्या सहाय्याने इमारतीवर चढणे व उतरणे यासह इमारतीस आग लागल्यास बचाव करण्याचे प्रशिक्षण यावेळी देण्यात आले.

- दि. ०५ जून ते दि. ११ जून दरम्यान दररोज, "प्रबोधनात्मक व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे" आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. शिवाजी शिंदे यांच्या "तरुणांसमोरील आव्हाने" या व्याख्यानाने सुरुवात झाली. पुढे श्री.ज्ञानेश पुरंदरे यांनी "स्वराज्या कडून सुराज्याकडे" तसेच श्री.डी.व्ही. कुलकर्णी, विभागीय महाव्यवस्थापक, महाउर्जा, विभागीय कार्यालय, लातूर यांनी "ऊर्जा संवर्धन आणि युवक" यावर मार्गदर्शन केले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातून आयोजक विद्यापीठाच्या गुणी कलावंतांनी पहिल्या दिवशी सर्वांचे मनोरंजन केले. पुढे सहभागी



Scanned by CamScanner

महाउर्जा, विभागीय कार्यालय, लातूर यांनी "ऊर्जा संवर्धन आणि युवक" यावर मार्गदर्शन केले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातून आयोजक विद्यापीठाच्या गुणी कलावंतांनी पहिल्या दिवशी सर्वांचे मनोरंजन केले. पुढे सहभागी विद्यापीठांच्या एकूण ४६ संघांनी आपापल्या कला प्रदर्शित केल्या. आणि दि. ११ जून २०१९ रोजी मुंबईहून आलेले युवारत्न श्री. अनिल केंगार यांनी समाज प्रबोधनात्मक भारुड सादर करून सर्वांची मने जिंकली.

- आव्हान-२०१९ मध्ये सहभागी झालेल्या सर्वांना आरोग्य विषयक सेवा-सुविधा पुरविण्यात आल्या. २४ तास अम्बुलंस, डॉक्टरांची टीम उपलब्ध करून तत्पर सेवा देण्यात आली. याचबरोबर सहभागी सर्व गटांनी, जिल्ह्यांनी विद्यापीठाच्या परिसरात भित्तीपत्रके, रांगोळ्या, चित्रे, रेखाटून, ढोल-ताशे, टाळ-मृदुंग, वारकरी दिंडी काढून आणि स्वच्छता – वृक्ष लागवड करून आपल्या रासेयोची मोहर उमटविली.

- आव्हान-२०१९ : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील १८ विद्यापीठांच्या स्वयंसेवक-स्वयंसेविका यांच्यासह संघव्यवस्थापक आदींनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली नांदेड शहरातील जुना मोंढा ते महात्मा फुले यांच्या पुतळ्यापर्यंत काढलेल्या शोभायात्रेत सहभाग घेऊन पारंपारिक कालांसह आपत्ती विषयक फलक, पथनाट्य, प्रात्याक्षिके आदींचे सादरीकरण केले.

- आव्हान-२०१९ मध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यापीठांच्या संघातून विविध पारितोषिकांसाठी नियमांप्रमाणे निवड करण्यात आली. त्यामध्ये उत्कृष्ट शोभायात्रेचा फिरता चषक "कोल्हापूर जिल्हा", उत्कृष्ट स्वयंसेवक प्रथम क्रमांक प्रसाद गुल्हाने (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) तर व्दितीय क्रमांक ओमकार हराळ (महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) आणि उत्कृष्ट स्वयंसेविका प्रथम क्रमांक चेतना गौतम (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर) तर व्दितीय क्रमांक श्वेता सथावणे (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) तसेच उत्कृष्ट संघव्यवस्थापिका श्रीमती अंबिका शर्मा (मुंबई विद्यापीठ, मुंबई) व उत्कृष्ट संघव्यवस्थापक श्री. ओमकार वसंतराव वाकचौरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), त्याचबरोबर उत्कृष्ट जिल्हा संघ प्रथम क्रमांक नांदेड जिल्हा तर व्दितीय क्रमांक भंडारा जिल्हा यांनी फिरते चषक पटकाविले.

- दि. १२ जून २०१९ रोजी डॉ.रवींद्र सिंगल, पोलीस विशेष महानिरीक्षक, औरंगाबाद यांच्या प्रमुख उपस्थितीत "समारोप सोहळा" संपन्न झाला. प्रसंगी डॉ. अतुल साळुंके, राज्यसंपर्क व विशेष कक्ष रासेयो अधिकारी, मंत्रालय, मुंबई, NDRF चे श्री. पुरूषोत्तम राणा, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, विद्या परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य, पत्रकार, जेष्ठ नागरिक, विविध संकुलाचे संचालक आणि त्यांचे सहकारी, प्रशासकीय अधिकारी आणि त्यांचे सहकारी, सहभागी विद्यापीठाच्या रासेयोचे संचालक, संघ व्यवस्थापक, आणि सर्व स्वयंसेवक- स्वयंसेविकांनी "समारोप सोहळ्यात" मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

(डॉ.शिवराज बोकडे)
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

(डॉ.उद्धव भोसले)
कुलगुरू,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.



Scanned by CamScanner